**प्रेसनोट दि. २८/११/२०१७**

## फिर्यादीच्या डोळयात मिरचिची पुड टाकून, जखमी करून जबरी चोरी करणाऱ्या टोळीस गुन्हे शाखा, युनिट १ ने शिताफीने केली अटक

खडक पोलीस स्टेशन पुणे शहर येथे गु.र.नं. ४६६/२०१७ भादविक. ३९४,३४ या गुन्हयामध्ये फिर्यादी यांचे डोळयामध्ये मिरची पुड टाकुन त्यांना लुटले होते. त्यामुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेली असुरक्षिततेची भावना लक्षात घेवून, सदर गुन्हा तात्काळ उघडकीस आणणे बाबत पोलीस आयुक्त रश्मि शुक्ला यांनी सक्त आदेश दिलेले होते.

पोलीस आयुक्त , यांनी दिलेले सक्त आदेशा प्रमाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन भोसले पाटील गुन्हे शाखा, युनिट १ यांचे सुचना प्रमाणे युनिट १ कडील अधिकारी व कर्मचारी हे सदर आरोपींचा शोध घेत असताना पो.ना. तुषार खडके व पो.हवा. रिजवान जिनेडी यांना दिनांक २८/११/२०१७ रोजी त्यांचे बातमीदारा मार्फत बातमी मिळाली की, खडक पोलीस स्टेशनचे हद्दीमध्ये सुमारे ३ दिवसापूर्वी फिर्यादीच्या डोळयात मिरचिची पुड टाकून, कोयत्याने वार करून त्यांना जबर जखमी केलेल्या गुन्हयातील सहा आरोपी सारस बागे मागिल रोडवर एकत्र जमणार आहेत. अशी बातमी मिळालेने, लागलीच सदर ठिकाणी युनिट १ कडील अधिकारी व स्टाफचा पो निरी नितीन भोसले पाटील यांनी सापळा रचुन, सदर ठिकाणी जमलेले इसम नामे १) प्रदीप उर्फ पद्या अदिनाथ गायकवाड, वय २९ वर्षे, रा. स.नं. १३२, पर्वती पायथा, साने गुरुजी शाळे समोर, सिंहगड रोड, पुणे व लेक टाऊन एस.आर.ए.बिल्डींग, फ्लॅट नं. ५०७, ५वा मजला, अपर इंदिरानगर, पुणे २) योगेश जालींदर आल्हाट, वय २९ वर्षे, रा. १३१/१, पानमळा वसाहत, सिंहगड रोड, पुणे ३० ३) सुरज उर्फ टिल्या अशोक म्हस्के, वय २३ वर्षे, रा. १३१/१, पानमळा वसाहत, सिंहगड रोड, पुणे ३० मुळ गांव मु.पो. सावरगांव, ता.तुळजापूर, जि. उस्मानाबाद, ४) अक्षय राम गायकवाड, वय २२ वर्षे, रा. स.नं. १३३, आंबिलवोढा वसाहत, दांडेकर पुल, पुणे, ५) आनंद उर्फ सिध्दु कदम, वय १९ वर्षे, रा. स.नं. १३३, विश्वकर्मा गॅरेज जवळ, दांडेकर पुल, पुणे, मुळ गांव भिमनगर, सम्राटनगर, सोलापूर ६) करण अंकुश जाणराव, वय १९ वर्षे, रा. स.नं. १३३, आंबिलवोढा वसाहत, माऊली शिरवळकर यांचे घराजवळ, दांडेकर पुल, पुणे, यांना ताब्यात घेवून, त्यांचेकडून एक युनिकॉन मोटार सायकल किं रु ६०,०००/-, एक स्प्लेंडर मोटार सायकल किं रु ४०००0/-मोबाईल रीचार्ज व्हाऊचर ७२,०००/- रु.चे व ४५००/- रु.रोख, व एक लोखंडी कोयता असा एकुण **१,७६,७००/- रु. चा** मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच त्यांचेकडून अशाच प्रकारचे गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

त्यांना विश्वासात घेवून त्याचेकडे दाखल गुन्हयाबाबत चौकशी केली असता, आरोपी यांनी फिर्यादीचे गुरुवार पेठेतील श्री एजंन्सी नावाचे दुकानात मोबाईलचे व्हाऊचर घेण्याचे बहाण्याने दुकानात जावुन, त्यांची प्रथम माहिती घेतली होती व फिर्यादीस लुटण्याचा प्लॅन **प्रदीप उर्फ पद्या अदिनाथ गायकवाड** व **योगेश जालींदर आल्हाट** यांनी सुमारे १० ते १२ दिवसापासून केला होता. त्यानुसार **सुरज उर्फ टिल्या अशोक म्हस्के** व **करण अंकुश जाणराव** हे गुन्हा करतेवेळेस फिर्यादीवर काही अंतरावर वॉच ठेवून होते. त्यांनी पुढच्या टिमला मोबाईल वरुन फिर्यादी हे येत आहेत असे कळविले. त्यानंतर फिर्यादी हे एकबोटे कॉलनीतील, मनमोहन पार्क सोसायटीच्या गेट समोर आले असता, तेथील सुरक्षारक्षक गेट

खोलत असतांनाच **अक्षय राम गायकवाड** याने फिर्यादीच्या डोक्यात **रॉड** मारून जखमी केले व आरोपी नामे **आनंद उर्फ सिध्दु कदम** याने फिर्यादीच्या डोळयात **मिरची पुड** टाकली व त्यांचेकडील पैशाची व मोबाईल व्हाऊचरची बॅग पळून घेवून गेले. तसेच आरोपी नामे **प्रदीप उर्फ पद्या अदिनाथ गायकवाड** व **योगेश जालींदर आल्हाट** यांनी फिर्यादीचे दुकानात जावून माहिती काढून जबरी चोरीचा सुमारे १० ते १२ दिवसापासून प्लॅन केला होता.

यातील आरोपी नामे आनंद उर्फ सिध्दु कदम याचेवर विश्रामबाग पो.स्टे. येथे सन २०१५ मध्ये भादविक. ३०२ चा गुन्हा दाखल आहे. आरोपी नामे अक्षय राम गायकवाड याचेवर दत्तवाडी पोलीस सटेशन येथे सन २०१३ मध्ये भादविक. ३०७ अन्वये गुन्हा दाखल आहे. तसेच आरोपी नामे करण अंकुश जाणराव याचेवर दत्तवाडी पोलीस सटेशन येथे सन २०१७ मध्ये भादविक. ३२६ अन्वये गुन्हा दाखल आहे.

सदरची कारवाई ही श्री. प्रदीप देशपांडे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री. पंकज डहाणे, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे. श्री समिर शेख, सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे-१ यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. नितिन भोसले-पाटील, स.पो.निरी. धनंजय कापरे, पोलीस उप-निरीक्षक दिनेश पाटील, हर्षल कदम, पो.हवा. रिजवान जिनेडी, तुषार खडके, इरफान मोमिन, श्रीकांत वाघवले, सचिन जाधव, इम्रान शेख, स.पो.फौज. राजाराम सुर्वे, पो.हवा. राजू पवार, उमेश काटे, प्रकाश लोखंडे, महेबुब मोकाशी, अशोक माने, सुभाष पिंगळे, गजानन सोनुने, प्रशांत गायकवाड, मोहन येलपले, यांनी केली आहे.



पुणे शहर पोलीस
गुन्हे शाखा, युनिट १, ची कामगिरी




पुणे शहर पोलीस
गुन्हे शाखा, युनिट १, ची कामगिरी